**जाहिरात क्र. ०१८/२००८**

**दिनांक - २४ जानेवारी , २००८**

**पदाचे नाव - बृहन्मुंबई शासकीय कार्यालयातील लघुलेखक व लघुटंकलेखक (अनुशेषाची पदे)**

**चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम व तपशील : -**

सदर पदांकरिता चाळणी परीक्षा घ्यावयाची ठरल्यास, चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम व इतर माहिती खालीलप्रमाणे राहील -

**सदर पदांकरिता चाळणी परीक्षा फक्त मुंबई केंद्रावर घेण्यात येईल.**

सदर चाळणी परीक्षा उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड करण्याच्या प्रयोजनार्थ असल्यामुळे या परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच ते उमेदवारांना कळविण्यात येणार नाहीत. प्रस्तुत परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना निकालाबाबत काहीही कळविले जाणार नाही किंवा या संदर्भातील त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तसेच परीक्षेच्या गुणांची पडताळणी करण्यासंबंधीची त्यांची निवेदनेही विचारात घेतली जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

खालील नमूद केलेल्या 'अ' मधील पदांसाठी एक आणि 'ब' मधील पदांसाठी दुसरी अशा दोन वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका असतील. या प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा अभ्यासक्रम व अनुषंगिक तपशील पुढीलप्रमाणे राहील.

**अभ्यासक्रम**

(अ) मराठी लघुलेखक उच्च श्रेणी व निम्न श्रेणी आणि मराठी लघुटंकलेखक या पदांकरीता मराठी व बुध्दिमापन चाचणी या दोन विषयांची, १५० बहुपर्यायी प्रश्न असलेली, १५० गुणांची, दीड तासांची, मराठी माध्यमाची, माध्यमिक शालांत परीक्षेच्या (एस.एस.सी.च्या ) दर्जाची एक वस्तुनिष्ठ प्रश्नपत्रिका असेल. या प्रश्नपत्रिकेतील मराठी व बुध्दिमापन चाचणी या विषयांचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे राहील.

[१] मराठी - सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, उता-यावरील प्रश्न.
( १०० गुण )

[२] बुध्दिमापन चाचणी - उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रस्तुत चाचणीमध्ये प्रश्न विचारण्यात येतील.
( ५० गुण )

(ब) इंग्रजी लघुलेखक उच्च श्रेणी व निम्न श्रेणी आणि इंग्रजी लघुटंकलेखक या पदांकरिता इंग्रजी व बुध्दिमापन चाचणी या दोन विषयांची, १५० बहुपर्यायी प्रश्न असलेली, १५० गुणांची, दीड तासांची, इंग्रजी माध्यमाची, माध्यमिक शालांत परीक्षेच्या (एस.एस.सी.) दर्जाची एक वस्तुनिष्ठ प्रश्नपत्रिका असेल. या प्रश्नपत्रिकेतील इंग्रजी व बुध्दिमापन चाचणी विषयांचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे राहील.

[१] इंग्रजी - सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, उता-यावरील प्रश्न.
( १०० गुण )

[२] बुध्दिमापन चाचणी - उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रस्तुत चाचणीमध्ये प्रश्न विचारण्यात येतील.
( ५० गुण )

ज्या उमेदवारांनी अर्ज योग्य रीतीने भरुन आवश्यक शुल्कासह सादर केला असेल त्यांना चाळणी परीक्षेस तात्पुरता प्रवेश दिला जाईल. चाळणी परीक्षेची तारीख वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येईल. ज्या उमेदवारांना चाळणी परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येईल त्यांना परीक्षा केंद्राचे ठिकाण व परीक्षेचे वेळापत्रक असलेले प्रवेशपत्र परीक्षेच्या आधी आयोगाकडून पाठविण्यात येईल. ज्या उमेदवारांना प्रवेशपत्र मिळाले नसेल त्यांनी परीक्षेच्या आधी तीन दिवस आयोगाच्या कार्यालयात प्रवेशपत्राची प्रतिलिपी घेण्यासाठी व्यक्तीश : यावे. ज्या उमेदवारांचे नाव प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या यादीत असेल त्यांनाच प्रवेशपत्राची प्रतिलिपी देण्यात येईल. प्रवेशपत्राची प्रतिलिपी देण्याबाबत कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही. किंवा सदर प्रतिलिपी टपालाने पाठविली जाणार नाही. सदर जाहिरातीतील अर्हतेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच चाळणी परीक्षेकरिता प्रवेश दिला जाईल. परंतु, ज्या उमेदवारांची अर्हता विवादास्पद असेल अशा उमेदवारांना त्यांची अर्हता तपासण्याच्या अधीन राहून चाळणी परीक्षेला तात्पुरता प्रवेश दिला जाईल. तद्नंतर जर उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आहे असे आढळले किंवा तो उमेदवार पदासाठी नमूद केलेली अर्हतेची अट पूर्ण करीत नाही असे नंतर आढळले तर निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. उमेदवारांना स्वखर्चाने परीक्षास्थळी हजर रहावे लागेल. उमेदवारांच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना त्यांनी उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरानांच गुण दिले जातील. त्या गुणांमधून चुकीची उत्तरे नमूद केल्याबद्दल गुण वजा केले जाणार नाहीत.

**अंध उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत -** अंध उमेदवारांचा अपवाद वगळता चाळणी परीक्षेसाठी उमेदवाराला कोणत्याही परिस्थितीत लेखनिकाची मदत पुरविण्यात येणार नाही. अंध उमेदवाराना सदर परीक्षेसाठी अधिसूचित पदांकरीता शासनाकडून त्यांची पात्रता ठरविण्याच्या अधीन राहून या परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश देण्यात येईल व आयोगाने ठरविलेल्या अटीवर परीक्षेच्या वेळी त्यांना आयोगामार्फत लेखनिकाची मदत पुरविण्यात येईल. सदरहू लेखनिकांचे मानधन म्हणून आयोगाने विहित केलेले शुल्क उमेदवारास भरावे लागेल. त्यासाठी अंध उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत मिळण्यासाठी विनंती अर्ज करुन आयोगाची आगाऊ परवानगी घेणे आवश्यक आहे. अंध उमेदवाराला ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही. म्हणून अंध उमेदवारानी परीक्षेच्या वेळी लेखनिकाच्या मदतीसाठी विनंतीचा अर्ज त्यांच्या आवेदनपत्राबरोबर उमेदवार ज्या जिल्ह्यातील सर्वसाधारण रहिवासी असेल त्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित विषयातील वैद्यकीय तज्ञांच्या मंडळाच्या उमेदवार अंध असल्याबाबतच्या प्रमाणपत्रासह " सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांचेकडे विहित मुदतीत म्हणजे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

**मौखिक व व्यक्तिमत्व चाचणी -** चाळणी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या तसेच जाहिरातीतील तरतूदीनुसार या पदासाठी पात्र असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आयोगातर्फे घेतल्या जातील. त्या उमेदवारांना मौखिक परीक्षेला व व्यक्तिमत्व चाचणीसाठी आयोगातर्फे बोलाविण्यात येईल व मुंबईत किंवा महाराष्ट्र राज्यातील इतर कोणत्याही ठिकाणी त्यांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

**मुंबई**
**दिनांक : २४ जानेवारी, २००८**

**नि.श.पटवर्धन**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**